कादंबऱ्यातून व्यक्त होणारे स्त्री दर्शन

श्रीमती कौशल्या माधवराव खरात
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रस्तावना :

१९६० नंतर स्त्रियांनी विविधांगी पातळीवर संघटनात्मक चळवळी केल्या आपले हक्क स्वातंत्र्य स्त्री अधिकार यांचे भान आल्याने जी पूर्वीची शरणागत, समन्वयवादी भूमिका होती ती बाजूला झाली आणि एकदम आत्मिक बळाने उचल घ्यावी तसा बदल होऊन स्त्रीवादी जाणिव निर्माण झाली. स्त्रियांनी मिळालेले गौणत्व तिच्या अधिकारांची झालेली पायमल्ली, पशुतुल्य वागणूक आर्थिक घटकांमधील वाटा नसणे अशा विविध गोष्टीमुळु जनजागृती झाली यातूनच प्रस्तापित सत्तमध्ये व पुरुषसत्ताक समाजव्यवस्था तसेच राज्यव्यवस्थेमध्ये बदल करण्याची भूमिका, जाणिव स्त्रियांमध्ये निर्माण झाली व त्यातून स्त्रीवादी साहित्य आकार घेऊ लागले. स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्रियांना त्यांच्या जीवनात असलेले पारंपारिक संकेत नष्ट करुन त्याला नवे आयाम येऊ लागले. दासी, सेवक, गुलाम, अर्धांगिणी, चूल-मूल यात रमणारी, शोषण सहन करणारी अशी रुपे कालबाहय होऊन स्त्रियांच्या जीवनात व्यवसाय, नौकरी, करिअर, शिक्षण यामुळे बदल झाले.

१९७० च्या दशकापर्यंत सकस असे स्त्री-केंद्रिय लेखन अपवादानेच आढळते. १९७० च्या दशकात जगभरात स्त्रीवादाची चर्चा मूळ धरु लागली होती. स्त्रियांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवणाऱ्या सामाजिक चळवळी जोर धरु लागल्या होत्या. त्यामुळे १९७५ नंतरच्या काळात अनेक स्त्रिया लिहित्या झाल्या. या काळातील स्त्री कादंरीलेखनामध्ये आशा, बगे, अरुणा ढेरे, सानिया, कमल देसाई, गौरी देशपांडे, इ. कांदबरीचे लेखन स्त्री समस्या आणि त्या समस्यांना तोंड देण्याची स्त्रीयांची वृत्ती यांचे चित्रण या कादंबऱ्यातून मांडले आहे.

६) **आशा बगे** या सत्तराच्या दशकात कथालेखिका म्हणून उदयाला आल्या. यांच्या 'मनस्विनी' १९७८), 'झुंबर' (१९८४), 'त्रिदल'(१९९४), 'धर्मक्षेत्र' (१९९६), 'सेतू' (२०००), 'भूमी' (२००४).

झुंबर :- कांदबरीमधील वसुमती सर्वांचा विरोध पत्करुन तिचे गुरु ऋषिकेश सोबत लग्न करते. कॉलेजचा मित्र-राघवाने वसुमतीला लग्नामध्ये साडी भेट देतो.

पुढे ऋषिकेश हा असाध्य रोगाने पिडीत होतो. ऋषिकेशचा विद्यार्थी राघव सोबत लग्न करण्याचा सल्ला वसुमतीला देतो. ऋषिकेश जिवंत असतानाच वसुमती राघवकडे जाते हे कार्य ती ऋषिकेशची मर्जी राखण्यासाठी करते. या कादंबरीमध्ये नायिका दोन पुरुषांच्या सहवासात आल्याने झालेली घालमेल या कादंबरीमध्ये चित्रित करण्यात आलेली आहे. वसुमती ही धाडसी असून सुध्दा शेवटी राघवशी लग्न न करता राहणारी अशी आहे.

७) डॉ. अरुणा ढेरे

अत्यंत रसाळ आणि ओघवत्या शैलीत लेखन करणाऱ्या आणि तितक्याच सुंदर बोलणाऱ्या वाचकप्रिय लेखिका. डॉ.अरुणा ढेरे यांनी लेखन हे वृत म्हणून स्वीकारलेले आहे. साहित्य आणि शब्द यांच्याशी त्यांचे जीवन जोडलेले आहे. 'मैत्रेयी' (१९८०), 'उर्वशी' (१९८९) आणि 'महाद्वार' (१९९०) या अरुणा ढेरे यांच्या लघुकादंबऱ्या आहेत. या पौराणिक कांदबऱ्या आहेत. मराठीतील पौराणिक कादंबऱ्या या मुख्यत: व्यक्तिप्रधान आहेत. नवीन प्रवाहाचा हा नवा आविष्कार आहे. डॉ. अरुणा ढेरे या कांदबऱ्यांतून व्यक्तिरेखांना वेगळे परिमाण प्राप्त करुन देतात.

मैत्रेयी (१९८०) या कादंबरीची मूळ कथा वाचकांच्या परिचयाची आहे. या कादंबरीमध्ये लेखिकेने मैत्रेयी या व्यक्तिरेखाने मागोवा घेतलेला आहे. ती एक प्रसिध्द विदुषी आहे. याज्ञवल्क्य हा मंत्रद्रष्टा ऋषी व मैत्रेयी आणि कात्यायनी या त्याच्या दोन बायका याज्ञवल्क्य वानप्रथाश्रम स्वीकारण्याचे ठरवतो. त्यामुळे तो आपल्या सर्व चीजवस्तुंची वाटणी करण्याचे ठरवतो. हा उद्देश तो मैत्रेयीला बोलून दाखवतो. पण मैत्रेयी वाटणी नाकारुन याज्ञवल्क्या बरोबर वनात निघून जाते.

८) **सानिया** यांच्या 'आवर्तना' आणि 'स्थलांतर' अशा दोन कादंबऱ्या प्रस्तुत प्रबंधातीला स्त्रीवादी भूमिकेच्या कादंबऱ्या आहे. सानिया स्त्रीवादी आणि जागतिक सांस्कृतिक अभिसरण यांचा डोळसपणे विचार करणाऱ्या लेखिका आहेत. कादंबरी लेखन करताना स्त्रीवादी भूमिकेतील स्त्रीचा स्वतंत्रपणे माणूस म्हणून विचार करण्याचा प्रयत्न त्या आपल्या व्यक्तिचित्रण प्रसंगी करताना दिसतात. असा प्रत्यय दोन्ही कादंबऱ्या वरवर चाळातानाही दिसते. पारंपारिक पुरुषाशी खुंटवून टाकलेले कुटुंबबांधील स्त्री जीवनाचा फेरविचार करावा लागणार आहे. कथाबीज, कथानक, व्यक्तिचित्रणे, संघर्ष, स्त्रीवादी भूमिकेच्या दृष्टीने व कलात्मकतेच्या दृष्टीने कादंबरी लेखनाचे यशापयश त्या मुद्दयांच्या आधारे सानियांच्या नायिकांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आवर्तन सानियाची 'आवर्तन' ही दुसरी कादंबरी १९९६ मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीतील स्त्रिया देखील परिस्थितीशी संघर्ष करीत स्वत:चे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. पुरुषप्रधान संस्कृतीतील किंवा समाजरचनेतील अनुभूती वारंवार प्रकटविणारी ही कादंबरी आहे. त्याचबरोबर स्त्रीमनाचे उद्‌गार तिची संवेदना वारंवार त्याच पध्दतीने व्यक्त करणारी अर्थात स्वतंत्र अस्तितत्व प्रकटवू इच्छिणारी स्त्री संवेदनेला पुन्हा-पुन्हा प्रकट करण्याची इच्छा बाळगणारी पारंपरिक समाजरनेत बंदिस्त झालेली स्त्री पिढयानुपिढया कशी आवर्तीत होते हे कथाबीज घेवून ही कादंबरी अवतरते.

९) **कमल देसाई** या मराठीतील एक प्रयोगशाल लेखिका आणि मराठीच्या अध्यापिका होत्य, कमल देसाई यांच्या निधनाने मराठी साहित्यातील एका फॅण्टसीलाच पूर्णविराम मिळाला आहे. 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' ही कादंबरी आणि 'काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई' ही जोड कादंबरी एवढंच मोजक लिहूनही कमल देसाई मराठी साहित्याच्या विरवात अजरामर झाल्या.

काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई कादंबरीमधील आपल्या ध्येयासाठी धडपडणाऱ्या एका स्त्रीयी कथा आहे हॅट घालणारी बाई ही आपल्या करिअरसाठी धडपडताना चित्रित केलेला आहे. चित्रपट काढण्यासाठी पैसा जमविण्याची

धडपड, आपल्या शरीराचही पर्वा न करता कैलासशी शरीरसंबंध ठेवते. एकूणच उच्चध्येयाच्या पूर्ततेसाठी सर्वस्व झुगारुन देणारी ही नायिका स्त्रीवादीच म्हणावी लागले.

१०) **गौरी देशपांडे,** गौरी, गौरी ज्या काळात लिहीत होती तो काळ स्त्रीमुक्तीच्या चर्चेला सुरुवात होण्याचा काळ होता. कथा, कादंबरी, ललित लेख, स्फुट लेखन, ललितेतर लेखन भाषांतर, कविता, संशोधन यासारखे बहुतांशी सगळे साहित्याप्रकार गौरी देशपांडे यांनी हाताळले. मराठी बरोबरच त्यांचे बरेचसे इंग्रजी लिखाण तसेच काही इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी अनुवादसुध्दा प्रकाशित झाले. एकंदरीत स्त्री स्वातंत्र्याच्या प्रखर पुरस्कर्त्या म्हणून गौरी देशपांडे आणि त्यांच्या साहित्याकडे बघता येते.

कारावासातून पत्रे आधुनिक स्त्रियांची घुसमट आणि त्यातून बाहेर येण्याची त्यांची घडपड, आपल्या मनातील प्रत्येक मानसिक, शारीरिक भावना स्पष्टपणे मांडते कादंबरीतील नायिका उच्च मध्यमवर्गीय आई वडिलांच्या शिकवणीमुळे मनासारखे वागू शकते. नायिका प्रियकराशिवाय म्हणजे पुरुषाशिवाय समर्थपणे जगू शकते. म्हणजे पुरुषासारखे स्वातंत्र्य मिळावे अशी इच्छा बाळगणारी स्त्री पुरुषाला पत्नी म्हणून चालत नाही. तसेच पुरुषाशिवाय जगणाऱ्या एकटया स्त्रीकडे बघण्याची समाजाची विकृती मानसिकता यातील नायिका ओळखून आहे. म्हणूनच 'आपलया जे बुध्दीला पटल ते करायला लागणारा आत्मविश्वास, मग लोक गेले खडयात' अशी स्वतंत्र्य, मनाप्रमाणे वागण्याची वृत्ती जोपासणारी स्त्री आहे. स्त्रीकडे पाहण्याची पुरुषांचा दृष्टीकोन जोपर्यंत दुय्यम आहे. तोपर्यंत तिची या कारावासातून सुटका नाही. या गौरीच्या विचारातून कादंबरी साकारलेली आहे.

सारांश : -

स्त्रीयांना आपले स्वातंत्र्य, हक्क, अधिकार यांची जाणीव १९६० नंतर जेव्हा स्त्रियांनी विविध पातळीवर संघटनात्मक चळवळी आंदोलने केली त्यावेळी त्यांना सर्व गोष्टी मिळत गेल्या स्त्रीयांचे होणारे शोषण, पिळवणूक त्याबद्दल मोठया प्रमाणात जनजागृती होऊन त्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर स्त्रीवादी साहित्य आकार घेऊ लागले.

स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्रियांना त्यांच्या जीवनात असलेले पारंपारिक संकेत नष्ट करुन त्याला नवी दिशा मिळू लागली. स्त्रीयांच्या जीवनात खऱ्या अर्थाने शिक्षणामूळेच बदल झालेले दिसून येते.

स्त्री केंद्रति लेखनामूळे स्त्रीयांच्या समस्या, अडचणी, हया मधून बाहेर आल्या. स्त्रीयाना जीवनात आलेल्या समस्यांना कशा प्रकारे तोंड दयावे हे घ्या कादंबऱ्यातून समोर येऊ लागले. त्यामध्ये प्रामुख्याने आशा बगे, अरुणा ढेरे, सानिया, कमल देसाई व गौरी देशपांडे यांनी अत्यंत परखडपणे स्त्रीयाच्या समस्या व अडचणीवर लेखन केलेले आहे. त्यांनी कशा प्रकारे लेखन केलेले आहे हया संशोधन पेपर मध्ये आढावा घेण्यात आला आहे.

संदर्भ ग्रंथसूची

१) स्त्री-लिखित मराठी कादंबरी (१९५० ते २०१०), अरुणा ढेरे, अरुण जाखडे पद्मगंधा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, ८ मार्च २०१३.

२) साहित्यातील स्त्रीवादी विचार वैविध्य (नियतकालिके, काव्य, कादंबरी) प्रा. किरण आगतराव जगदाळे, गोदावरी प्रकारशन जुलै २०१९.

३) डॉ. अरुणा ढेरे 'अध्या वाटेवर', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २००२.

४) आवर्तन, सानिया,मौज प्रकाशन ४३५ २५ नोव्हेंबर १९९६.

५) नव्वदोत्तर मराठी साहित्य, : सत्यवान मेश्राम संपादक मंडळ-डॉ. अजय कुळकर्णी डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. कृष्णा साकुळकर, डॉ. दत्तात्रय वाटमोडे.

६) मराठी कादंबरी नव्या दिशा, डॉ. किशोर सानपनिर्मल प्रकाशन नांदेड.

७) रंगनाथ पठारे 'आजची कादंबरी नोंदी आणि निरीक्षणे', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१४.